# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०३/२०२५ (बुधवार)

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ६० लाख ८५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०४/०३/२०२५ रोजी मौदा पोलीस, हददीत रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना भंडारा कडुन नागपुर कडे रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी महादुला फाटा येथे नाकाबंदी केली असता ,संशयीत ट्रक क्रमांक एम.एच. ३६ ए.बी. २८४५ आणि ट्रक क्रमांक एम.एच ३६ ए.बी. ३५३४ भंडारा कडुन येताना दिसले परंतु ट्रक चालकांनी पोलीसांना पाहुन दोन्ही ट्रक महादुला गावाकडे वळवले.पोलसांनी ट्रकचा पाठलाग केला असता दोन्ही ट्रक महादुला गावात रेती खाली करतांना मिळुन आले. पोलीसांनी ट्रक क्रमांक एम.एच ३६ ए.बी २८४५ च्या चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव रामकृष्ण गंगाराम बोंद्रे रा. बेटाळा ,ता. मोहाडी जि.भंडारा असे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. ट्रक क्रमांक एम.एच ३६ ए.बी ३५३४ चा चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव कोमल रोशन गाढवे रा. ता.जि. भंडारा असे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. दोन्ही ट्रक मध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालकंना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन १) ट्रक क्रमांक एम.एच. ३६ ए.बी २८४५ आणि ९ ब्रास रेती ,एक ॲड्रॉइड मोबाईल असा एकुण ३०,४०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला २) ट्रक क्रमांक एम.एच ३६ ए.बी ३५३४ आणि १० ब्रास रेती,एक ॲड्रॉइड मोबाईल असा एकुण ३०,४५,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही

चालकाकंडुन **एकुण किंमती ६०,८५,००० /— रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दोन्ही ट्रक चालक आणि मालक **यांच्या** विरूध्द पोस्टे मौदा येथे **कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.**